



# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ   Mob- 9822720784   Email- jansanchlan@gmail.com   RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे   अंक : ३०७ वा   बुधवार   दि २५ फेब्रुवारी २०२६   पृष्ठ ८   किंमत ३ रुपये


# उम्र भर का गम हमें इनाम दिया है, हिंदी गाण्याचे शब्द बोलत जयंत पाटील भावूक

**वृत्तसंस्था/मुंबई**

अजित दादांच्या अनंत आठवणी मनात आहेत. हिंदीत सुप्रसिद्ध गाणं आहे. दुश्मन ना करे दोस्त ने वो काम किया है उम्र भर का गम हमें इनाम दिया है, असं म्हणत असताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांना रडू कोसळलं. त्यांना हुंदका दाटून आला. पण ते थांबले नाहीत. ते बोलत राहिले. मुंबईच्या वरळी डोम येथे अजित पवार यांच्या निधनानंतर शोकसभेचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमाला सर्वपक्षीय नेत्यांनी हजेरी लावली. राज्यातील सर्व दिग्गज नेते या कार्यक्रमाला हजर होते. सर्व नेत्यांनी यावेळी अजित दादांच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी भाषण करताना जयंत पाटील हे भावूक झाले. त्यांना रडू कोसळलं. पण ते भाषणात न थांबता बोलत राहिले. त्यांनी अजित पवार यांच्यासोबतच्या अनेक आठवणी सांगितल्या गेले जवळपास ३८ वर्षे आम्ही एकत्रित काम केलं. क्लासमेट



म्हटलं की, दहा-बारा वर्षांची साथ असते. पण मला आठवतं १९९१ पासून आम्ही विधानसभेच्या एका वर्गात जवळपास शेजारी-शेजारी बसायचो. १९१४ पासून तर शेजारी बसण्याचे प्रसंग अनेकदा आले. अजित दादांचे अनेक पैलू आम्ही सगळ्यांनी जवळून पाहिले. माझ्याकडे तर प्रचंड आठवणी आहेत. खुल्या मनाचा, दिलदार मनाचा आणि विरोध करायचा असेल तर ठामपणाने करणारा नेता म्हणून आम्ही अजित दादांना अनुभवलं. राजकारणात गोड बोलावं लागतं, सगळ्यांना सांभाळून घ्यावं लागतं. असं मी त्यांना नेहमी सांगायचो. ते म्हणायचे, गोड बोलायचं मला जमत नाही. तो तुमचा मार्ग आहे. मी जे आहे तेच सांगणार. एखाद्या मीटिंगच्या आधी सांगितलं की, हे आमक्या जिल्ह्यातील तालुक्याचे येत आहेत, थोडं शांतीने घेऊ आणि मग हाताळू. मला सांगायचं आहे, ते मी आताच सांगणार. एवढा ठामपणा मी महाराष्ट्रातल्या, देशातल्या कुठल्याही नेत्यात बघितला नाही. जे असेल ते समोर आणि रोखठोक म्हणून अजित दादांबद्दल एक घोषणा असायची. एकच वादा, अजित दादा. ते खरंच होतं. महाराष्ट्रातील सगळीकडे जनतेला ही खात्री असायची आणि म्हणून जनता ही घोषणा द्यायची.

# सहकार विद्या मंदिर, डोंगर खंडाळा जिल्ह्यातील पहिली एआय प्रमाणित शाळा

**जनसंचलन/बुलढाणा**

श्रीमती बसंतीबाई देवकीसजी चांडक सहकार विद्या मंदिर, डोंगर खंडाळा, या शाळेने जिल्ह्यातील पहिली एआय सर्टिफाइड ( ) शाळा होण्याचा मान मिळवून शैक्षणिक क्षेत्रात विशेष कामगिरी नोंदवली आहे. आदरणीय राधेश्यामजी चांडक (भाईजी) यांच्या प्रेरणेने तसेच ग्रामीण भागातील शाळेने बुलडाणा अर्बन को. सो चे अध्यक्ष डॉ सुकेशजी झंवर साहेब यांच्या संकल्पनेप्रमाणे आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून डिजिटल शिक्षणाच्या दिशेने टाकलेले पाहिजे हे महत्त्वाचे पाऊल संपूर्ण जिल्ह्यासाठी प्रेरणादायी ठरत आहे. ही प्रतिष्ठित मान्यता मिळवण्यासाठी टीमचे रोहितकुमार शर्मा (), प्रशांत वासुगडे()यांचे मार्गदर्शन लाभले. भविष्यातील तंत्रज्ञान आजच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने डिजिओ टीमने शाळेत सर्वसमावेशक एआय प्रशिक्षण सत्रांचे आयोजन केले. या उपक्रमांतर्गत इयत्ता ६ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता(एआय), मशीन लर्निंगची प्राथमिक ओळख, डिजिटल साधनांचा वापर, डेटा समज, तसेच तांत्रिक समस्यांचे निराकरण या विषयांवर




सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले. विशेष म्हणजे केवळ विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित न राहता शाळेतील सर्व शिक्षकांसाठी देखील अत्याधुनिक एआय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. यामुळे शिक्षक वर्ग नव्या डिजिटल पद्धती आत्मसात करून अध्यापन अधिक परिणामकारक करण्यास सज्ज झाला आहे. बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक बनवण्यासाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरत आहे. शाळेच्या प्रगतीमागे आदरणीय कोमल झंवर मॅडम यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व लाभले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेत नेहमीच नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांमध्ये भविष्यातील कौशल्ये विकसित करणे, तंत्रज्ञानातील प्राविण्य वाढवणे आणि नवोन्मेषी विचारसरणी घडवणे यावर विशेष भर दिला जात आहे. केवळ पाठ्यपुस्तकापुरते शिक्षण न ठेवता प्रत्यक्ष अनुभवाधारित शिक्षणावर शाळा लक्ष केंद्रित करत आहे



# मराठी-भाषा व समाजसंस्कृती




भाषा स्वतंत्र नसते. ती समाजसंस्कृतीचा भाग असते. त्यामुळे मराठी भाषेचा गौरव दिन म्हणजे मराठी समाजाचा, मराठी संस्कृतीचा गौरव दिन म्हटला पाहिजे व आपल्यापैकी प्रत्येकाला जसा स्वतः च्या नाव-आडनावाचा म्हणजे घराण्याचा, जातीचा अभिमान असतो, तसा तो आपल्या मराठीपणाचाही वाटला पाहिजे. खरे तर, तो प्रत्येकाच्या मनात असतोही. ङ्गमराठी मनफ म्हणून त्याला उजळा द्यायचे ठरवले तर स्वाभाविकपणे आठवू लागतात - ज्ञानेश्वर, तुकाराम, शिवाजी, बाजीराव असे इतिहासपुरुष आणि महाराष्ट्राची स्वातंत्र्यलढ्यातील कामगिरी म्हणून जांभेकर ते आंबेडकर येथपर्यंतची प्रबोधन परंपरा. या सर्व मंडळींनी त्यांच्यावर जी जबाबदारी इतिहासक्रमात आली, ती पूर्ण सामर्थ्याने निभावली (शिवाय पोवाडा, लावणी यांसारख्या कला विकसित झाल्या). त्या साऱ्यांच्या लेखी महाराष्ट्र, मराठी भाषा असा विषय नव्हता. संतांना व वीरपुरुषांना तत्कालीन जे युद्धग्रस्त वातावरण होते त्यास त्यांच्या परीने तोंड द्यायचे होते अथवा त्यावर मात करायची होती. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, महाराष्ट्र राज्याची स्थापना संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातून (१९५०-६०) झाली तेव्हा आणि शिवसेना १९६६च्या सुमारास स्थापन झाली तेव्हा... अशा दोन वेळा महाराष्ट्राचा व मराठी माणसाचा हुंकार ऐकू आला. राज ठाकरे विभक्त झाले व त्यांनी चार-पाच कोटी रुपये खर्च करून शिवाजी पार्कवर सभा घेतली तेव्हा ते काही प्रेरक वाक्ये बोलले होते, जसे की ङ्गमाझा शेतकरी जीन पँट घालून शेती करीलफ वगैरे - त्यात मराठीपण व आधुनिक दृष्टी दिसली. तेव्हाही मराठी सुशिक्षितांची उमेद जागी झाली होती... पण ती किती फसवी आहे हे लवकरच लक्षात आले व राज ठाकरे ङ्गएंटरटेनरफम्हणून मनावर बिंबले ते कायमचे - लाव रे तो व्हिडिओ... मराठी अस्मिता प्रकट झाल्याचे एरवी कधी जाणवले नाही. हे खरे, की गेल्या शंभर वर्षांमध्ये मराठीच्या स्थितिगतीवर अनेक विद्वानांनी अनेक वेळा भाष्य केले आहे, किंबहुना कुसुमाग्रजांनी मंत्रालयासमोर उभ्या, राजमुकुट घातलेल्या दीनवाण्या मराठी भाषादेवतेचे वर्णन १९८९ मध्ये केले, ते राज्यकर्त्यांना फार बोचले, मग त्यांनी कुसुमाग्रजांचा जन्मदिन हा मराठी भाषादिन म्हणून जाहीर केला. त्यामुळे मराठी भाषा विभागाला आणि मराठी भाषेत काम करणाऱ्या शेकडो साहित्यिक-प्राध्यापक-पत्रकारांना तो मानधनासहित साजरा करता येऊ लागला. मराठी भाषेचा उद्धार त्यातून किती झाला ते नाही सांगता येणार, पण मधल्या काळात दोन वर्षांपूर्वी मराठी भाषेला केंद्र सरकारकडून अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, राज्य सरकारने मराठी विद्यापीठाची स्थापना केली, आता अनुवाद अकादमी अस्तित्वात आली आहे. मराठीबद्दल आस्था आणि मराठीचे प्रेम असलेला साहित्यिक वृत्तीचा किरण कुळकर्णी यांच्यासारखा उच्चाधिकारी विभागाला लाभला आहे आणि सामाजिक व सांस्कृतिक संवेदना असलेले आशीष शेलार व उदय सामंत हे मंत्री संबंधित खात्यांना जबाबदार आहेत. त्यामुळे मराठीचा दणका वाढत आहे - त्यातून विश्वभाषा संमेलने, भाषाविषयक दिन व सप्ताह-पंधरवडे साजरे होत आहेत. मराठी लेखक-प्रकाशक यांना सन्मानपदके लाभत आहेत. मराठी भाषाप्रेम हा अशा तऱ्हेने एक राजकीय मुद्दा होऊन तो सरकारी यंत्रणेत अचूक ठिकाणी जाऊन बसला आहे. परिणामतः भाषेवर प्रेम करणारे ठाकरे बंधू, भाषेचे राजकारण करू इच्छिणारे दीपक पवारसारखे विद्वान प्राध्यापक आणि सरकारला ङ्गयाही मुद्यावर विरोध करून पाहूफ असे म्हणणारे डावे पक्ष एकत्र येऊन सत्तारूढ पक्षाला कात्रीत पकडण्याची संधी साधू पाहत आहेत. मराठी भाषेचे ङ्गमीडियाफ्तून प्रकटणारे वर्तमान असे आहे. वास्तवात महाराष्ट्राच्या सुमारे बारा कोटी जनतेला मराठी भाषेबद्दल आत्मीयता असली तरी तिला आधुनिक तंत्रसज्ज जगात आधुनिक मूल्यांसह जगण्याची इच्छा जास्त आहे. ङ्गहिंदी-तिसरी भाषाफ या मुद्यावरून वादळ माजले, मोर्चे निघाले, तेव्हा ते संघटित राजकारण होते - त्यात मीडिया सहभागी होता हे आमजनांनी जाणले व त्याचबरोबर त्यांचे हित-अनहित त्यात गुंतलेले नाही हे त्यांना कळले होते. एक साधा मुद्दा घेऊ. मराठी शाळा बंद पडत आहेत व इंग्रजी शाळा वैभवाप्रद जात आहेत. तरीसुद्धा मराठी शाळा चालू ठेवण्याचा अट्टहास करता येईल का? ध्येयप्रेरित अनेक शाळा-संस्थांच्या हकिगती समोर आहेत - ठाण्याच्या ङ्गसरस्वती मंदिरफची लढाई ही त्यांतील शेवटची. तरी गेल्या आठवड्यात मराठी शाळा चालू ठेवण्यासाठी कोठेतरी मोर्चा निघाल्याचे वाचले! मराठीच्या या राजकारणात गेल्या वर्षातील एक मोठी घटना आपल्याकडून दुर्लक्षित झाली. पिंपरी-चिंचवड कॉलेजमधून पूर्णतः मराठी माध्यमातून पदवीधर झालेली साठ संगणक अभियंत्यांची एक तुकडी ठिकठिकाणी नोकऱ्यांना लागली. त्यांना पंधरा ते पंचेचाळीस लाख रुपयांची पॅकेजेस मिळाली. त्यातील एका मुलीचे नाव आहे सुफिया सय्यद. ती साठ मुले वीस जिल्ह्यांतून आलेली आहेत.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# कृषीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद घेणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य : फडणवीस

## कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित ॲप्स आणि डिजिटल प्लॅटफॉर्मचे लोकार्पण




**मुंबई :** शेतकऱ्याने डिजिटल सेवांचा आत्मविश्वासाने वापर केला पाहिजे. शेतकऱ्यांसाठी सुरू केलेल्या विविध डिजिटल ॲपमुळे शेतकरी त्यांच्या भाषेत संवाद साधून शेती विषयक प्रश्नांचे उत्तर त्वरित मिळवू शकतात. महा-एआय इनोव्हेशन सेंटरद्वारे विद्यापीठे, संशोधन संस्था, उद्योग यांना एकत्र आणून एका डिजिटल सक्षम परिसंस्थेद्वारे शेतकऱ्यांचे जीवनमान सुकर करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. शेतकऱ्यांच्या व्यापक हितासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद घेणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतीचा सर्वसमावेशक विकास करण्यावर शासनाचा भर असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे सांगितले.

'महाराष्ट्र कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५-२०२९ ' धोरणांतर्गत येथील जिओ वर्ल्ड कन्व्हेंशन सेंटर येथे 'जागतिक कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद आणि गुंतवणूकदार शिखर संमेलन'(एआय फॉर ॲग्री २०२६) च्या उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाचे केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) डॉ. जितेंद्र सिंह, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, अपर मुख्य सचिव (कृषी) विकास चंद्र रस्तोगी, कृषी आयुक्त सूरज मांढरे, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प संचालक परिमल सिंह, जागतिक बँकेचे कार्यकारी संचालक परमेश्वरन अय्यर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताने डिजिटल पायाभूत सुविधा आणि एआयला राष्ट्रीय विकासासाठी महत्वाचे स्थान दिले आहे. इंडिया एआय मिशनचा उद्देश तंत्रज्ञानाच्या माध्यमातून समावेशकता, पारदर्शकता आणि व्यापक परिणामकारकता आहे. शेती हे प्रत्येक घराशी व प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाशी निगडित असलेले क्षेत्र आहे. कृषी क्षेत्राला पुढे नेण्याचा संकल्प करण्यात येत असून महाराष्ट्र राज्य एआय क्रांतीत आघाडीवर राहिल. सर्वसमावेशक एआय कृषी धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र पहिले राज्य ठरले आहे.

शेतकऱ्यांसाठी महा-विस्तार एआय हा डिजिटल साथीदार विकसित करण्यात आला आहे. याच्या सहाय्याने शेती विषयक सल्ला, हवामान व कीड व्यवस्थापनाविषयी माहिती, बाजार भावाचे संकेत आदींसह शासकीय योजनांपर्यंत सुलभ प्रवेशही मिळणार आहे. आतापर्यंत ३० लाख शेतकऱ्यांपर्यंत हे ॲप पोहचले असून नोंदणीमध्ये वाढ होत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र केवळ एआय वापरकर्ता न राहता, जबाबदार आणि परिणामकारक कृत्रिम बुद्धिमत्ता वापरणारे अग्रगण्य राज्य बनेल. प्रत्येकाकडे स्मार्टफोन नाही, प्रत्येक शेतकरी ॲप वापरत नाही आणि प्रत्येकाला मराठीतच माहिती हवी असेही नाही. म्हणूनच शासनाने बहुभाषिक आणि व्हॉइस-आधारित डिजिटल सुविधा सुरू केल्या आहेत. यासाठी स्थानिक भाषांना प्राधान्य देण्यात आले आहे. यामुळे शेतकरी डिजिटल सेवांचा आत्मविश्वासाने वापर करत आहेत. पुढील काळात ही सेवा प्रत्येक तालुका आणि गावापर्यंत विस्तारण्याचा राज्य शासनाचा मानस आहे. शेतकऱ्यांसाठी महा एआय इनोव्हेशन सेंटरद्वारे विद्यापीठे, संशोधन संस्था आणि उद्योग यांना एकत्र आणून एक सक्षम आणि उपयुक्त परिसंस्था (इकोसिस्टम) उभी करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## कार्डिॲक अरेस्टमुळे माजी रेल्वेमंत्री मुकुल रॉय यांचे निधन



**कोलकाता :** माजी रेल्वेमंत्री आणि तृणमूल काँग्रेसचे नेते मुकुल रॉय यांचे निधन झाले. रविवारी मध्यरात्री दीड वाजताच्या सुमारास कार्डिॲक अरेस्टमुळे त्यांनी अखेरचा श्वास घेतला. कोलकातामधील साल्ट लेक येथील अपोलो रुग्णालयात त्यांची प्राणज्योत मालवली. ते ७१ वर्षांचे होते.

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे एकेकाळी अत्यंत जवळचे सहकारी मानले जाणाऱ्या मुकुल रॉय यांचे वयाच्या ७१ व्या वर्षी निधन झाले. कोलकाता येथील अपोलो रुग्णालयात उपचारादरम्यान कार्डिॲक अरेस्टमुळे त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांचे सुपुत्र सुभ्रांशू रॉय यांनी याविषयी माहिती दिली. डिमेंशियाचे निदान झालेले मुकुल रॉय अनेक आजारांनी ग्रस्त होते. काही दिवसांपूर्वी ते कोमात गेले होते.

सर्व काही संपले आहे. मध्यरात्री १:३० वाजताच्या सुमारास तीव्र कार्डिॲक अरेस्टने त्यांचे निधन झाले. त्यानंतर त्यांना प्राण वाचवणणे शक्य झाले नाही.' अशा भावना सुभ्रांशु रॉय यांनी व्यक्त केल्या.

मुकुल रॉय यांनी युवक काँग्रेसमधून राजकीय कारकिर्दीचा श्रीगणेशा केला. त्यावेळी ममता बॅनर्जी यांचे ते निकटचे सहकारी झाले. १९९८ मध्ये तृणमूल काँग्रेसच्या स्थापनेनंतर त्यांनीही काँग्रेसचा हात सोडला. अल्पावधीतच ते पक्षाचा राष्ट्रीय पातळीवरील चेहरा झाले. २००६ मध्ये त्यांना तृणमूलचं महासचिवपद मिळालं. पुढे यूपीए २ सरकारच्या कार्यकाळात ममता बॅनर्जी यांनी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्रिपदाची धुरा सांभाळण्यासाठी रेल्वे मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर मुकुल रॉय यांच्याकडे केंद्रीय मंत्रालयाची जबाबदारी सोपवण्यात आली होती. त्यावेळी पक्षातील दुसऱ्या क्रमांकाचे नेते असलेले मुकुल रॉय हे ममता बॅनर्जींचे अत्यंत विश्वासू मानले जात. मात्र २०१५ मध्ये बॅनर्जींसोबत झालेल्या तीव्र मतभेदांनंतर दरी वाढत गेली.

२०१७ मध्ये भाजप नेते अरुण जेटलींची भेट घेतल्याने त्यांना तृणमूलमधून निलंबित करण्यात आलं होतं. काही दिवसातच त्यांनी भारतीय जनता पक्षाचा झेंडा हाती धरला. परंतु २०२१ मध्ये त्यांनी भाजपला रामराम ठोकत पुन्हा तृणमूलमध्ये प्रवेश केला.

## अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला महायुतीचा निर्धार



**मुंबई :** महाराष्ट्रात आज सोमवारपासून अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होणार आहे. अधिवेशनाच्या पूर्वी रविवारी मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, गेल्यावर्षी बजेट मंडताना अजितदादा म्हणाले होते, विकास आता लांबणार नाही, महाराष्ट्र आता थांबणार नाही. शिस्तप्रिय आणि आर्थिक घडी कशी बसवायची आणि प्रसंगी आपल्या सगळ्या सहकाऱ्यांना आपल्या राज्याच्या आर्थिक बाबींबद्दल स्पष्टपणे सांगणारे अजितदादा गेले २५-३० वर्षे सोबत काम करताना आपण पाहिले आहे. आता त्यांचे जे काही स्वप्न आहे ते आपण पूर्ण करणार आहोत, महाराष्ट्राला पुढे नेणार आहोत. आता यावेळेसचे बजेट मुख्यमंत्री देवेंद्रजी मांडणार आहेत. ते देखील उत्तम अर्थतज्ञ आहेत. राज्याची आर्थिक नाडी त्यांना माहित आहे. पत्रकार परिषदेत बोलताना सुनेत्रा पवार म्हणाल्या, महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात होत आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला चहापानचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यात विविध विषयांवर चर्चा व्हावी हे अपेक्षित असते. आता हे दुसरे अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे. आपल्या सर्वांना माहीत आहे की अजितदादा यांनी राज्याचा ११ वेळा राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. २०११ साली पहिल्यांदा सादर केलेला अर्थसंकल्प हा १ लाख ४४ हजार ७८३ कोटी रुपयांचा होता. तर २०२५ मध्ये त्यांच्या कारकीर्दीतील शेवटचे अर्थसंकल्प हे सर्वाधिक ७ लाख २० हजार कोटी रुपयांचे होते. ही केवळ आकड्यांमध्ये झालेली वाढ नाही तर राज्याच्या सर्वांगीण विकासात झालेली वाढ आहे.

## आता आदिवासी पाडा तिथे एसटी : सरनाईक





**मुंबई :** सह्याद्रीच्या धुक्याने वेढलेल्या डोंगररांगा असोत की मेळघाटचे दुर्गम भाग, आता प्रत्येक आदिवासी पाड्यापर्यंत 'लालपरी' पोहोचणार आहे. 'केवळ गाव तिथे एसटी नाही, तर आता आदिवासी पाडा तिथे एसटी' असा ठाम निर्धार करत परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी राज्याच्या विकासाचा एक नवा अध्याय सुरू केला आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाने जारी केलेल्या पत्रकानुसार, सह्याद्री व मेळघाटच्या कुशीत, धुक्याने वेढलेल्या डोंगरदऱ्यांमध्ये, आजवर केवळ पायवाटांनीच ओलांडलेले अंतर आता 'लालपरी' च्या चाकांनी मोजले जाणार आहे. राज्यातील दुर्गम आदिवासी पाड्यापर्यंत एसटीची सेवा पोहोचवण्याचा ऐतिहासिक संकल्प परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी जाहीर केला आहे. 'आता केवळ गाव तिथे एसटी नाही, तर आदिवासी पाडा तिथे एसटी,' असा ठाम निर्धार करत त्यांनी विकासाचा नवा अध्याय सुरु केल्याची घोषणा केली.

राज्य परिवहन महामंडळ ९ मीटर लांबीच्या, ३५ आसनी अशा १०० अत्याधुनिक मिडी बसेस खरेदी करीत असून या बसेसना 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी' असे प्रेरणादायी नामकरण करण्यात येणार आहे. अरुंद रस्ते, तीव्र चढ-उतार आणि वळणावळणाच्या घाटरस्त्यांवरून सहज धावू शकतील, अशा या बसेस खास करून आदिवासी पाड्यांसाठीच नियोजित आहेत.

# कार चालकाला शिक्षा करुन आमचं बाळ परत येणार नाही; २ वर्षांच्या लेकाचा मृत्यू; ड्रायव्हरच्या मुक्ततेची मागणी

**शारजाह :** परदेशात झालेल्या एका दुर्दैवी अपघातात भारतीय जोडप्याच्या दोन वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. मात्र यात कुणाचाही दोष नव्हता, असं म्हणत या जोडप्याने आरोपी कार चालकाची शिक्षा माफ करण्याचा निर्णय घेतला आहे.

तुर्कीच्या किनाऱ्यावर सीरियाच्या चिमुकल्या ॲलन कुर्दीच्या कलेवराचे फोटो पाहून अख्खं जग हादरलं होतं. त्यानंतर जवळपास एका दशकानंतर, केरळमध्ये जन्मलेल्या यूएईतील एका भारतीय अधिकाऱ्याने त्याच्या मुलाचे नाव ॲलन रुमी असे ठेवून त्या पवित्र स्मृतींचा सन्मान करण्याचा निर्णय घेतला. नशिबाचा क्रूर खेळ म्हणावा की काय, गेल्या आठवड्यात २२ महिन्यांच्या ॲलन रुमीचा शारजाहच्या मुवैलेह भागात एका विचित्र अपघातात मृत्यू झाला. त्यानंतर शोकाकुल पालकांनी अपघातास कारणीभूत मानल्या गेलेल्या कार चालकावर दोष ठेवण्याऐवजी क्षमा करण्याचा पर्याय निवडला, असे वृत्त खलीज टाईम्स आणि गल्फ न्यूजने दिले आहे.



एक वर्ष दहा महिन्यांच्या ॲलन रुमीचा घराजवळील सँडी पार्किंग लॉटमध्ये अपघाती मृत्यू झाला. 'ही कुणाचीही चूक नव्हती. ही एक दुर्दैवी घटना होती ज्यामध्ये दोन्ही बाजूंकडून लक्ष देण्यात चूक झाली होती. ड्रायव्हरला शिक्षा करुन आमचा मुलगा परत येणार नाही. आम्ही आता आयुष्यात पुढे जाण्याचा प्रयत्न करत आहोत.' असं कुटुंबाने सांगितलं.

जेव्हा आम्हाला कळले की त्या रात्री त्याला (ड्रायव्हरला) चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे, तेव्हा मी पोलिसांना कळवले की आम्हाला त्याच्याविरुद्ध तक्रार करायची नाही. आम्ही ते लेखी स्वरुपात देखील दिले आहे.' असं ॲलनच्या वडिलांनी सांगितलं. हे आमचे झालेले नुकसान भरुन काढू शकत नाही, परंतु नकळत घडलेल्या एखाद्या गोष्टीबद्दल आम्ही दुसऱ्या कुटुंबाला दुःखात टाकू इच्छित नाही.' असंही ते म्हणाले. शारजाह पोलिसांनी ही दुर्घटना संध्याकाळी ७ नंतर घडल्याची पुष्टी केली. असे अपघात टाळण्यासाठी पालक आणि वाहन चालकांनी अधिक काळजी घेण्याचे आवाहन पोलिसांनी केले. दुर्घटनेच्या दिवशी वडील शेराफुद्दीन हे दुबई इन्व्हेस्टमेंट पार्क आणि अल क्वोजमध्ये काम करत होते. आई ही कचरा टाकण्यासाठी ॲलनला सोबत घेऊन खाली गेली होती. कचऱ्याचा डबा वाळूच्या पार्किंग लॉटच्या एका टोकाला आहे. मुलं खेळतात त्या ठिकाणी एक फूटपाथ आहे. आमचा एक शेजारी त्यांच्या मुलाला घेऊन खाली आला, जो ॲलनच्याच वयाचा होता. मुलं एकत्र खेळत असताना त्यांना एक मजर दिसली आणि ते तिच्या मागे धावले, असं ॲलनच्या वडिलांनी सांगितलं.


माझ्या पत्नीने त्यांना थांबवण्यासाठी हाक मारली. दुसरा मुलगा थांबला, पण जेव्हा माझ्या मुलाने मागे वळून पाहिलं आणि माझी पत्नी त्याच्या मागे धावत असल्याचं त्याला दिसलं, तेव्हा त्याला वाटलं की आई त्याच्यासोबत खेळत आहे. तो हसून किंचाळला आणि पूर्ण वेगाने धावला, पण नेमका गाडीखाली आला. संबंधित ड्रायव्हर त्याच्या पत्नीला आणण्यासाठी त्याची गाडी पार्किंगमधून बाहेर काढत होता. हा एक भयानक अपघात होता ज्यामध्ये कोणाचीही चूक नव्हती. ॲलनच्या दुःखी आईने सांगितलं की, 'मी त्याला पकडू शकले नाही. तो गाडीच्या खूप जवळ होता. ड्रायव्हर त्याला पाहू शकत नव्हता. हे अचानक घडलं. आम्ही दोघंही काहीही करु शकलो नाही.

ती म्हणाली की, त्याच ड्रायव्हरने रुग्णवाहिकेची वाट पाहण्याऐवजी त्यांना जवळच्या खाजगी रुग्णालयात नेलं. नंतर डॉक्टरांनी मुलाला सरकारी रुग्णालयात रेफर केलं, परंतु रुग्णवाहिकेने हलवूनही तो अंतर्गत दुखापतींमुळे मरण पावला.

## सोलापुरात नवविवाहितेने आयुष्य संपवलं, हातावर लिहिले शेवटचे शब्द

**सोलापूर :** 'माझं हसू झालंय... माझं पार्लर बंद केलं... जीव होता तो माझा... स्वप्न होतं गं...' असे शब्द तळहातावर लिहित विवाहितेने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यात घडली आहे. नातेपुते परिसरात राहणाऱ्या अवघ्या २२ वर्षांच्या पायल शशिकांत रणदिवे हिने आयुष्याची अखेर केली. सासरच्या जाचाला कंटाळून तिने टोकाचं पाऊल उचलल्याचा आरोप होत आहे.

सोलापूर जिल्ह्यात माळशिरस तालुक्यातील खुळेवाडी येथे राहणारी विवाहिता पायल रणदिवे हिला स्वतःचं ब्युटी पार्लर सुरु करायचे होतं. त्यासाठी तिने रीतसर क्लासही लावला होता. मात्र सासरच्या मंडळींनी तिच्या स्वप्नांना सुरुंग लावल्याचा दावा केला जात आहे. शनिवारी संध्याकाळी पायलने राहत्या घरी आत्महत्या केली. 'हसू झालंय माझं, माझं पार्लर बंद केलं, जीव होता तो माझा, स्वप्न होतं ग.. आजपर्यंत शांत बसले पण आता नाही. चांगल्या आई-बापाची लेक आहे म्हणून निघूनपण नाही गेले. माझ्यामुळे त्रास झाला असेल तर माफी मागते' असे शब्द पेनने हातावर लिहून पायलने



आयुष्य संपवल्याचा आरोप केला जात आहे. पायलच्या अंगावर मारहाणीच्या खुणा असल्याचीही प्राथमिक माहिती आहे. त्यामुळे माहेरच्या मंडळींनी रणदिवे कुटुंबाकडून शारीरिक अत्याचार होत असल्याचा आरोप केला आहे. या प्रकरणी पती शशिकांत मारुती रणदिवे, सासू छाया मारुती रणदिवे, सासरे मारुती दामू रणदिवे आणि दीर कैलास मारुती रणदिवे यांच्यावर गुन्हा दाखल करुन अटक केली आहे. दरम्यान गुन्हा नोंदवण्यापूर्वी नातेवाईकांनी पायलचा मृतदेह नातेपुते पोलीस ठाण्यात आणून ठेवला होता. पोलिसांनी गुन्हा दाखल झाल्यानंतरच तिच्या माहेरच्यांनी तिचं पार्थिव घरी नेल्याची माहिती आहे.

पायलचे शवविच्छेदन केल्यानंतर तिच्या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. ऐन तारुण्यात पायलची दुर्दैवी अखेर झाल्यामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## आठवीतील सहा विद्यार्थिनींशी चाळे

**चंद्रपूर :** शहरातील एका नामांकित शाळेत एका वर्गशिक्षकाने आठव्या वर्गातील सहा विद्यार्थिनींशी अश्लील वर्तन केल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी गुरुवारी पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल झाला असून शिक्षकाला अटक करण्यात आली आहे. गोवर्धन गोंडाणे असे आरोपी शिक्षकाचे नाव आहे. शाळेतील शिक्षक वर्गातील विद्यार्थिनींशी गैरवर्तन करत असल्याची माहिती शहर पोलिसांना मिळालेली होती. पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी प्रकरणाचे गांभीर्य ओळखत तातडीने शहानिशा करण्याचे आदेश दिले. त्यानुसार एका महिला पोलिस कर्मचाऱ्याने साध्या वेशात शाळेत जाऊन चौकशी केली. प्राथमिक तपासात तथ्य आढळताच महिला व बालविकास विभागाने विद्यार्थिनींशी संवाद साधला. यावेळी सहा मुलींनी या शिक्षकाच्या कृत्यांचा पाढाच वाचला. त्यावरून त्याला अटक केली. आरोपी गोवर्धन गोंडाणे हा मागील अनेक वर्षांपासून याच शाळेत कार्यरत होता. तो वर्गात शिकवताना मुलींकडे अत्यंत वाईट नजरेने बघायचा. शाबासकी देण्याच्या नावावर शरीराला अश्लील स्पर्श करणे, मांडीला हात लावणे आणि संगणक लॅबमध्ये एकट्या विद्यार्थिनीला बोलावून अश्लील चाळे करणे, असे कृत्य करत होता.

## मंदिरामुळे चप्पल काढली, बॅनर हटवताना पालिका कर्मचाऱ्याचा मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर :** अनधिकृतरीत्या लावलेले बॅनर काढण्यासाठी गेलेल्या महापालिकेच्या कामगाराचा वीजेचा शॉक लागून मृत्यू झाला. ही घटना शनिवारी सकाळी मुकुंदवाडी परिसरातील हनुमान मंदिराजवळ घडली. यात एक मजूर गंभीर जखमी झाला. या प्रकरणी दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

दरम्यान महापालिकेकडून दिलेल्या तक्रारीवरुन अनधिकृत बॅनर लावणाऱ्याविरुद्ध सदोष मनुष्यवधासह अन्य कलमानव्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर मृत अमोल जाधव यांचे मेहुणे महेंद्र लोखंडे यांच्या फिर्यादीवरून महापालिकेचे सुपरवायझर शिवशाम काळे, संबंधित अधिकारी व बॅनर लावणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

याप्रकरणी महापालिकेचे सहायक आयुक्त प्रसाद देशपांडे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, फिर्यादी व पथक अनधिकृत होर्डिंग्ज, बॅनर हटविण्याची कारवाईसाठी मुकुंदवाडी परिसरात गेले होते. सकाळी साडेनऊच्या सुमारास मुकुंदवाडी गावातील हनुमान मंदिर परिसरातील अनाधिकृत पोस्टर, बॅनर काढण्यासाठी महापालिकेचे सफाई कर्मचारी अमोल दिनकर जाधव व रवींद्र रणधीर रिडलॉन हे गेले होते. मंदिर असल्याने चप्पल काढून ते गेले होते.

बॅनर काढल्यावर लोखंडी भाग उच्चदाबाच्या विद्युत तारेच्या संपर्कात आला. जाधव व रिडलॉन यांना वीजेचा शॉक लागून ते दोघे भाजले. या दोघांना उपचारासाठी चिकलठाणा येथील जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. डॉक्टरांनी अमोल जाधव यांना तपासून मृत घोषित केले. रवींद्र रिडलॉन यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

पायात चप्पल नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात विजेचा धक्का लागल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तक्रारीवरुन दिपक खोतकर, प्रल्हाद गायकवाड, प्रशांत ठोंबरे, श्रीमंत गायकवाड, रघुनाथ पिपळ, स्वप्निल उर्फ सोनु, बॅनर प्रिंट करुन देणारे दुकानदार, व इतर पाच ते सात जणांविरोधात सदोष मनुष्यवधासह अन्य कलमांनुसार गुन्हा दाखल झाल्याचे पोलिसांनी सांगितले. महापालिकेचे सुपरवायझर शिवशाम काळे, संबंधित अधिकारी व बॅनर लावणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

## विशीतील सख्ख्या बहिणींनी लग्नाच्या काही तास आधी आयुष्य संपवलं



**जोधपूर :** दोन सख्ख्या बहिणींचं एकाच दिवशी एकाच मांडवात लग्न लागणार होतं. त्यामुळे कुटुंबातील आनंदही द्विगुणित झाला होता. मात्र त्याआधीच अक्रित घडलं. लग्न होण्याच्या काही तास आधी दोघीही बहिणींनी आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. राजस्थानमधील जोधपूर येथे शनिवारी ही घटना घडली. या प्रकारामागे षड्यंत्र असल्याचा आरोप एका महिलेने केला आहे.

मृतांची ओळख पटली असून शोभा (२५) आणि विमला (२३) अशी सख्ख्या बहिणींची नावं आहेत. त्या दीप सिंग यांच्या मुली होत्या. दोघीही एका खाजगी शाळेत शिक्षिका म्हणून काम करत होत्या.

विषारी पदार्थाचे सेवन केल्याने या बहिणींचा मृत्यू झाला असावा, असे प्राथमिक तपासात दिसून आले आहे . शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल. इतक्यात त्यांच्या मृत्यूचे कारण ठरवणे घाईच ठरेल, असे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी पहाटे दोघींची प्रकृती बिघडल्याने कुटुंबीयांनी त्यांना तातडीने जोधपूरमधील एका खाजगी रुग्णालयात नेले. मात्र तिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. पोलिसांना घटनेची माहिती मिळताच कुटुंबीयांनी अंत्यसंस्काराची तयारी सुरु केली होती, त्यानंतर अधिकारी घटनास्थळी पोहोचले आणि मृतदेह ताब्यात घेतले. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आणि नंतर कुटुंबीयांना परत देण्यात आले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

शोभा आणि विमला यांचे मामा जसवंत सिंग यांनी या घटनेसाठी त्यांच्या वडिलांच्या कुटुंबातील सदस्यांना जबाबदार धरले आहे. मुलींचे पिता दीप सिंगच्या भावांनी दोघी बहिणींचे लग्न लावून देण्यासाठी कुटुंबावर दबाव आणला होता, असा आरोप त्यांनी केला आहे. दीप सिंगच्या धाकट्या भावाच्या कथित दबावामुळे बहिणींनी हे टोकाचे पाऊल उचलले, असाही आरोप मामाने केला. पोलिसांनी सांगितले की तपासाचा भाग म्हणून या आरोपांची चौकशी केली जात आहे. याप्रकरणी अनैसर्गिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील चौकशी सुरू आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बांगलादेशला हरवत भारतीय संघ अजिंक्य




## तेजल हसबनीस सामनावीर

**संक्षिप्त धावफलक**

- **भारत अ महिला संघभारत अ महिला संघ :** २० षटकात ७ बाद १३४ (तेजल हसबनीस नाबाद ५१, राधा यादव ३६, दिनेश वृंदा १९, अवांतर ५, फहिमा खातून ४-२५, इस्मिन, फातिमा जहान प्रत्येकी १ बळी)
- **बांगलादेश अ महिला संघ :** १९.१ षटकात सर्वबाद ८८ (शमीमा सुल्ताना २०, शर्मिन सुल्ताना १८, फहिमा खातून १४, सादिया अख्तर १०, प्रेमा रावत ३-१२, सोनिया मेंदिया व तनुजा कंवर प्रत्येकी २ बळी, सईमा ठाकुर, मिनू मणी, राधा यादव प्रत्येकी १ बळी).

**बँकॉक (थायलंड)/वृत्तसंस्था :** 'सामनावीर' तेजल हसबनीसच्या नाबाद अर्धशतकाच्या जोरावर रविवारी येथे झालेल्या २०२५-२६ च्या महिलांच्या आशिया चषक रायझिंग स्टारर्स टी-२० क्रिकेट स्पर्धेत अंतिम सामन्यात भारत अ महिला संघाने बांगलादेश अ महिला संघाचा ४६ धावांनी पराभव करत विजेतेपद पटकाविले. या अंतिम सामन्यात कर्णधार राधा यादवची ३६ धावांची खेळी आणि तेजलचे नाबाद अर्धशतक ही वैशिष्ट्यो ठरली.

या सामन्यात भारत अ महिला संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारताने २० षटकात ७ बाद १३४ धावा जमविल्या. त्यानंतर बांगलादेश संघाचा डाव १९.१ षटकात ८८ धावांत आटोपला.

नंदीनी काश्यप आणि दिनेश वृंदा यांनी ३१ चेंडूत ३० धावांची भागिदारी केली. यानंतर भारताचे चार फलंदाज लवकर बाद झाले. वृंदाने ४ चौकारांसह १९ तर काश्यपने १ चौकारासह ८ धावा केल्या. अनुष्का शर्मा १ चौकारासह ८ धावांवर बाद झाली. मिनू मणीला खातेही उघडता आले नाही. तेजल हसबनीस आणि कर्णधार राधा यादव यांनी पाचव्या गड्यासाठी ६९ धावांची भागिदारी केली. राधा यादवने ३० चेंडूत १ षटकार आणि ३ चौकारांसह ३६ धावा जमविल्या. तनुजा कंवरने केवळ १ धाव जमविली. प्रेमा रावत ४ धावावर बाद झाली. ममताने नाबाद २ धावा केल्या. तेजल हसबनीसने शेवटपर्यंत खेळपट्टीवर राहून ३४ चेंडूत २ षटकार आणि ३ चौकारांसह नाबाद ५१ धावा जमविल्या. भारताच्या डावामध्ये ३ षटकार आणि १२ चौकार नोंदविले गेले. भारताने पॉवरप्ले दरम्यानच्या ६ षटकात ३२ धावा जमविताना १ गडी गमाविला. तेजलने ३३ चेंडूत २ षटकार आणि ३ चौकारांसह अर्धशतक पूर्ण केले. बांगलादेश अ महिला संघातर्फे फहिमा खातूनने २५ धावांत ४ तर फर्जना इस्मिन आणि फातिमा जेहान यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला. भारताच्या गोलंदाजीसमोर बांगलादेशचा डाव १९.१ षटकात ८८ धावांत आटोपला. सलामीच्या शमीमा सुल्तानाने १५ चेंडूत ३ चौकारांसह २०, सर्मीन सुल्तानाने ३० चेंडूत १ चौकारासह १८, कर्णधार फहिमा खातूनने ११ चेंडूत १ चौकारासह १४ तर सादिया अख्तरने १५ चेंडूत १ चौकारासह १० धावा केल्या. बांगलादेशच्या डावात १ षटकार आणि ८ चौकार नोंदविले गेले. बांगलादेश महिला संघाने पॉवरप्ले दरम्यानच्या ६ षटकात ३६ धावा जमविताना १ गडी गमाविला. भारतातर्फे प्रेमा रावतने १२ धावांत ३ तर सोनिया मेंदिया आणि तनुजा कंवर यांनी प्रत्येकी २ तर सईमा ठाकुर, मिनू मणी व राधा यादव यांनी प्रत्येकी १ बळी मिळिवला.

# कार्तिक, निर्माबेन मॅरेथॉन विजेता

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** रविवारी येथे आयोजित केलेल्या अकराव्या नवी दिल्ली मॅरेथॉनचे जेतेपद मुंबईचा धावपटू कार्तिक करकेरा ,महिलांच्यात निर्माबेन ठाकुरने पटकाविले. ही मॅरेथॉन ४२.२ कि. मी. पल्लूयाची आयोजित केली होती.

मुंबईच्या कार्तिक करकेराने नवी दिल्ली मॅरेथॉन २ तास, १३ मिनिटे आणि १० सेकंदाचा अवधी घेत जिंकली. तसेच त्याने जपानमध्ये चालू वर्षाअखेरीस होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठीची पात्रता मर्यादा पार केली आहे. व्यवसायाने डॉक्टर असलेल्या २८ वर्षीय कार्तिक करकेरा आता आगामी जपानमध्ये होणाऱ्या आशियाई स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. नवी दिल्ली मॅरेथॉनमध्ये गोपी थोंकलने २ तास, १३ मिनिटे आणि १२ सेकंदाचा अवधी घेत दुसरे स्थान तर मानसिंगने २ तास, १३ मिनिटे आणि १५ सेकंदाचा अवधी घेत तिसरे स्थान पटकाविले. या मॅरेथॉनमध्ये इलाईट महिलांच्या विभागात




निर्माबेन ठाकुरने २ तास, ४१ मिनिटे आणि १५ सेकंदाचा अवधी घेत विजेतेपद मिळिवले. भागिरथीने २ तास, ४३ मिनिटे आणि २८ सेकंदाचा अवधी घेत दुसरे स्थान तर महाराष्ट्रच्या अश्विनी जाधवने २ तास, ५६ मिनिटे आणि ५९ सेकंदाचा अवधी घेत तिसरे स्थान पटकाविले. नवी दिल्ली मॅरेथॉनमध्ये ३१ देश आणि ४९० शहरातील सुमारे ३० हजार धावपटू सहभागी झाले होते. नवी दिल्ली मॅरेथॉनला ऑलिम्पिक पदक विजेता विजेंद्र सिंग आणि टेनिसपटू रोहन बोपण्णा यांनी ध्वज दाखवून उद्घाटन केले.

# आफ्रिकेकडून भारत ७६ धावांनी पराभूत

**अहमदाबाद/वृत्तसंस्था :** आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या सुपर- ८ च्या अत्यंत महत्त्वाच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने टीम इंडियाचा ७६ धावांनी धुव्वा उडवला. प्रथम फलंदाजी करताना आफ्रिकेने टीम इंडियासमोर १८८ धावांचे लक्ष्य ठेवले होते. विजयी आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय संघ १८.५ षटकांत १११ धावांत ऑलआऊट झाला. या पराभवासोबतच भारताची सेमीफायनलची वाट बिकट झाली आहे. उर्वरित दोन्ही सामन्यात टीम इंडियाला मोठ्या फरकाने विजय मिळवावा लागणार आहे.

१८८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघाची सुरुवात अत्यंत खराब झाली. पॉवरप्लेच्या ६ षटकाअखेर भारताने ३१ धावांवर आपले ३ महत्त्वाचे फलंदाज गमावले आहेत. सलामीवीर ईशान किशनला भोपळाही फोडता आला नाही. तर तिलक वर्मा (१) आणि अभिषेक शर्मा (१५) हे देखील झटपट माघारी परतले. त्यानंतर या पाठोपाठ वॉशिंग्टन सुंदरदेखील बाद झाला असून त्याने ११ चेंडूत ११ धावा केल्या. कर्णधार सूर्यालाही फार मोठी खेळी साकारता आली नाही. अखेरच्या षटकात शिवम दुबेने केलेल्या फटकेबाजीशिवाय अन्य एकालाही मैदानात तग धरता आला नाही. भारतीय संघ १८.५ षटकात १११ धावांवर आटोपला. दक्षिण आफ्रिकेच्या संघाने




७६ धावांनी सामना जिंकत सेमी फायनलचा आपला मार्ग सुकर केला आहे.

नरेंद्र मोदी स्टेडियमवर रंगलेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा फलंदाजीचा निर्णय घेतला. डावाच्या पहिल्याच षटकात जसप्रीत बुमराहने आफ्रिकेला जोरदार धक्का दिला. संघाचा हुकमी एक्का क्विंटन डी कॉक अवघ्या ६ धावांवर माघारी परतला. बुमराहच्या या धक्क्यातून सावरण्याआधीच अर्शदीप सिंगनेही कर्णधार मार्करमला केवळ ४ धावांवर बाद केले, त्याचा हार्दिक पांड्याने झेल टिपला. यावरच थांबायचे नाही, तर बुमराहने रायन रिकेल्टनलाही ७ धावांवर पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला.

# घरच्या मैदानावर श्रीलंकेचा इंग्लंडकडून ५१ धावांनी दणदणीत पराभव

**मुंबई/वृत्तसंस्था :** पल्लेकलच्या आव्हानात्मक खेळपट्टीवर अनाकलनीय फटक्यांद्वारे श्रीलंकन फलंदाजांनी फाजीलपणा केला. हा फाजीलपणा एकूणच महागात पडला आणि यजमानांना अनपेक्षित पराभवाचा धक्का बसला. रविवारी झालेल्या सुपर- ८ मधील सामन्यात इंग्लंडने श्रीलंकेला ५१ धावांनी पराभूत करत दोन गुणाची कमाई केली. प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडने ९ बाद १४६ धावा केल्या, तर विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेचा संघ ९५ धावांत ऑलआऊट झाला.

प्रारंभी, श्रीलंकेचा कर्णधार दासून शनाकाने टॉस जिंकून बॉलिंगचा निर्णय घेतला. खेळपट्टीचा नूर ओळखत श्रीलंकेच्या दुनिथ वेल्लागे, महेश तीक्षणा या फिरकीपटूंनी इंग्लंडच्या फलंदाजां भोवती फास आवळला. अनुभवी जोस बटलरला सूर गवसला नाही. तो ७ धावा करून तंबूत परतला. जेकब बेथेलचा चेंडू न पाहता मोठा फटका खेळण्याचा प्रयत्न अंगलट आला. ३ धावा करून तोही माघारी




परतला. चोरटी धाव घेण्याचा टॉम बॅन्टनचा (६) प्रयत्न फसला. वेल्लागेने इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रूकला (१४) पायचीत पकडले. याशिवाय, सॅम करनही सपशेल अपयशी ठरला. एका बाजूने सातत्याने विकेट्स पडून सहकारी बाद होत असतानाही फिल सॉल्टने ६ चौकार आणि २ षटकारांसह ६२ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. सॉल्टच्या या महत्वपूर्ण खेळीमुळे इंग्लंडला १४६ धावापर्यंत मजल मारता आली. विल जॅक्सने २१ धावांचे योगदान दिले. जेमी ओव्हर्टनने १० धावा केल्या.

कँडीतील पल्लेकलच्या मैदानात धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेचा संघ सहज बाजी मारेल, असे वाटत होते. पण तिसऱ्या षटकात जोफ्रा आर्चरने फॉर्ममध्ये असलेल्या पथुम निसंकाला अवघ्या ९ धावांवर तंबूचा रस्ता दाखवला. त्यानंतर चौथ्या षटकांत पुसल मेंडिस आणि पवन रथनायके हे दोघेही लागोपाठ बाद झाले. पॉवरप्लमध्ये विल जॅक्सने तीन विकेट्स घेतल्या तर जोफ्राने दोन विकेट्स घेत श्रीलंकेची अवस्था ५ बाद ३४ अशी बिकट केली. श्रीलंकेच्या फलंदाजांनी खराब शॉर्ट सिलेक्शन करताना स्वत:चा घात करून घेतला. कर्णधार शनाका व कमिंदू मेंडिस ही जोडी श्रीलंकेला सावरण्याचा प्रयत्न करत होती, परंतु त्यांना यश आले नाही. मेंडिस १३ धावांवर बाद झाला. कर्णधार दासून शनाका याच्याकडून अपेक्षा होत्या आणि त्याने ३० धावांची खेळी करून इंग्लंडला दडपणाखाली ठेवले होते. पण तो बाद झाला अनब लंकेच्या उरल्या सुरल्याही अपेक्षा संपुष्टात आल्या. श्रीलंकन संघ १६.४ षटकांत ९५ धावांत ऑलआऊट झाला.

**इंग्लंड वरचढ, पाक, लंका, न्यूझीलंडमध्ये चुरस**

इंग्लंडने लंकेवरील विजयासह सुपर ८ मधील ग्रुप २ मध्ये २ गुणांसह अव्वल स्थान पटकावले आहे. न्यूझीलंड व पाकिस्तान यांचा सामना पावसामुळे रद्द झाला होता आणि त्यामुळे दोघांना प्रत्येकी १ गुण दिला गेला आहे. आता इंग्लंडचा पुढील सामना पाकिस्तानविरुद्ध होणार आहे आणि यात विजय मिळवून ते उपांत्य फेरीतील जागा पक्की करण्याच्या दिशेने आगेकूच करतील. पाकला उपांत्य फेरीत गाठायची असेल तर उर्वरित दोन्ही (वि. इंग्लंड आणि वि. श्रीलंका) सामन्यांत विजय मिळवावे लागणार आहेत. न्यूझीलंडच्या बाबतीतही (वि. श्रीलंका व वि. इंग्लंड) हेच समीकरण असेल. श्रीलंका उर्वरित दोन सामने (वि. न्यूझीलंड व वि. पाकिस्तान) जिंकून ४ गुणांपर्यंत पोहोचतील. अशा परिस्थितीत नेट रन रेट महत्त्वाची भूमिका बजावेल.

# कॅन्सरनंतर दीपिकाला आणखी एक आजार, स्वत:च माहिती देत ती म्हणाली की आता..



**मुंबई :** 'ससुराल सिमर का' मधून घराघरात पोहोचलेली प्रसिद्ध अभिनेत्री दीपिका कक्कर पुन्हा एकदा आरोग्याच्या समस्या अनुभवत आहे. काही महिन्यांपूर्वी तिला लिव्हर कॅन्सरचे निदान झाले होते, त्यानंतर तिला यशस्वी सर्जरी करण्यात आली आणि ती हळूहळू सर्वसामान्य आयुष्यात परतली होती. मात्र, आता तिला पोटात तीव्र वेदना जाणवू लागल्याने तातडीने रुग्णालयात तपासणीसाठी जाण्याची गरज भासली.

या अद्ययावत माहितीचे अपडेट खुद्द दीपिकाने व्लॉगद्वारे चाहत्यांना दिले. व्लॉगमध्ये तिने सांगितले की तिच्या पोटात सिस्ट (गाठ) झाली असून, तिच्यावर प्रोसिजर करणे आवश्यक आहे. सिटी स्कॅनमध्ये सिस्टची साइज १.३ सेंटीमीटर असल्याचे स्पष्ट झाले. दीपिकाच्या पोटासोबतच खांदासुद्धा दुखत असल्याचे तिने सांगितले आणि या वेदनेमुळे ती चिंतित होती. तथापि, इतर सर्व रिपोर्ट्स नॉर्मल असल्याचे तिने स्पष्ट केले.

शोएब आणि दीपिकाने रुग्णालयातूनच हा नवीन व्लॉग पोस्ट केला. शोएब म्हणाला, 'दोन दिवसांपासून दीपिकाच्या पोटात खूप वेदना होत होत्या. काल वेदना अधिक तीव्र झाल्यामुळे तिला डॉक्टरांकडे आणलं. सिटी स्कॅनमध्ये पोटात सिस्ट असल्याचे निदान झाले. याशिवाय इतर सर्व रिपोर्ट्स नॉर्मल आहेत.'

दीपिकाने तिच्या अनुभवाबद्दल खुलासा करत म्हटले, 'लिव्हर कॅन्सर झाल्यापासून माझ्या मनात नेहमीच भीती आहे की पुन्हा कॅन्सर होऊ नये. डॉक्टरांनी पोटातील सिस्टवर उपचार करण्याचा निर्णय घेतला आहे. ही कोणतीही मोठी शस्त्रक्रिया नाही; छोट्या प्रोसिजरने सिस्ट बर्न केली जाईल. त्यासाठी मला तीन ते चार दिवसांसाठी रुग्णालयात राहावं लागेल. आम्ही अल्लाहचे आभार मानतो की सुरुवातीच्या स्टेजमध्येच सिस्टबद्दल माहिती मिळाली.' दीपिकाने चाहत्यांना सल्ला दिला की, 'छोट्या छोट्या वेदनेकडे दुर्लक्ष करू नका. आरोग्याची लक्ष देणे महत्त्वाचे आहे. माझ्यासाठी प्रार्थना करा.' व्लॉगवर चाहत्यांनी कमेंट्स करत दीपिकाला लवकर बरे होण्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. अनेकांनी तिला मानसिक आधार दिला तर काहींनी तिच्या स्वास्थ्याबाबत काळजी व्यक्त केली.

विशेषज्ञांचे म्हणणे आहे की, लिव्हर कॅन्सरवर मात करणाऱ्या रुग्णांसाठी या प्रकारच्या सिस्टसारख्या समस्या तातडीने लक्षात घेणे आवश्यक आहे. सुरुवातीच्या स्टेजमध्ये उपचार घेतल्यास रुग्ण जलद बरे होऊ शकतात, म्हणून दीपिकाचे वेळेवर तपासणीसाठी जाणे अत्यंत महत्त्वाचे ठरले. दीपिकाचा हा अनुभव चाहत्यांसाठीही जागरूकतेचा संदेश आहे. छोट्या वेदनांकडे दुर्लक्ष न करता नियमित तपासण्या आणि डॉक्टरांचा सल्ला घेणे आरोग्याच्या दृष्टीने खूप महत्त्वाचे आहे.

## शमिताला मिळाले नवे प्रेम



**मुंबई :** प्रेम वयाच्या कुठल्याही टप्प्यात प्राप्त होऊ शकते, असे बोलले जाते. आता प्रख्यात अभिनेत्री शिल्पा शेट्टीची बहिण शमिताच्या आयुष्यात प्रेमाने एंट्री केली आहे. शमिता आणि दीपेश शर्मा हे परस्परांच्या प्रेमात पडले असल्याचे समोर आले आहे. दीपेशने शेअर केलेल्या पोस्टमध्ये शमिता दिसून येत आहे. या पोस्टमध्ये त्याने अप्रत्यक्ष स्वरुपात शमितासोबत प्रेमात असल्याची कबुलीच दिली आहे.

दीपेश शर्मा हा टेक्नो आर्टिस्ट आहे. दीपेशसोबतच्या नात्यात ती आनंदी असल्याचे तिच्या काही निकटवर्तीयांकडून सांगण्यात आले आहे. दीपेशसोबत ती सध्या बराच वेळ घालवित आहे. दोघेही परस्परांना अधिक समजून घेतल्यावर नात्याची अधिकृत वाच्यता करणार असल्याचे समजते.

दीपेशपूर्वी शमिता ही अभिनेता राकेश बापटसोबत रिलेशनशिपमध्ये राहिली होती. दोघांचे नाते बिग बॉसच्या घरातून सुरू झाले होते. तर त्यापूर्वी तिचे नाव उदय चोप्रासोबत जोडले गेले होते. यानंतर राकेश आणि शमिताचा ब्रेकअप झाला होता. शमिताने 'मोहब्बतें' चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये पदार्पण पेले होते. यानंतर ती 'फरेब', 'कॅश', 'बेवफा' आणि 'जहर' समवेत अन्य काही चित्रपटांमध्ये दिसून आली होती.

## सचिन कुमावतच्या शॉकिंग एलिमिनेशनमुळे चाहते नाराज



**मुंबई :** 'बिग बॉस मराठी ६' सुरू होऊन आता सहा आठवडे झाले आहेत. सहाव्या आठवड्यात खानदेशचा किंग सचिन कुमावत बिग बॉसच्या घराचा निरोप घेतो. सहाव्या आठवड्यात ९ सदस्य नॉमिनेट झाले होते. यात प्रभू शेळके, प्राजक्ता शुक्रे, दीपाली सय्यद, रुचिता जामदार, राकेश बापट, सचिन कुमावत, अनुश्री माने, रोशन भजनकर आणि सागर कारंडे यांचा समावेश आहे. काल भाऊच्या धक्क्यावर गायक सचिन कुमावतने घरातून एक्झिट घेतली.


नऊ सदस्यांमधून बॉटम-३ मध्ये रुचिता जामदार, रोशन भजनकर आणि सचिन कुमावत होते. तिघांना तीन दरवाजांसमोर उभे केले. गार्डन एरियातील दरवाजासमोर सचिन उभा होता, तोच दरवाजा उघडतो आणि सचिनचा घरातील प्रवास संपतो. सचिन घराबाहेर जाताच सदस्य खूपच भावुक होतात. त्याला घट्ट मिठी मारतात. खूप रडतात.

घराबाहेर पडल्यावर सचिन कुमावत स्टेजवर येतो. आपल्या संपूर्ण प्रवासाबद्दल भावना व्यक्त करतो. तसेच घरातील सर्व सदस्यांचे, प्रेक्षकांचे, चाहत्यांचे आणि रितेश भाऊंची आभार मानतो. तो खूप भावुक होतो. त्यानंतर सचिनचा प्रवास दाखवण्यात आला. तो घरात कायम सदस्यांना सांभाळून घेताना दिसला. बाहेर आल्यावर सचिन म्हणाला, 'भाऊ बिग बॉसच्या घरातील प्रवास खूप सुंदर होता. येथे खूप गोष्टी शिकलो. येथे माझ्या खानदेशची ओळख मी निर्माण करू शकलो.'

सचिनचे कौतुक करत रितेश भाऊ म्हणाले की, 'या घरातला चांगला माणूस कोण तर सचिन भाऊ, दीड महिन्यांत महाराष्ट्रात तुम्ही एक वेगळी आणि खूप चांगली ओळख निर्माण केली आहे. ही अशी ओळख या घरात राहून निर्माण करणे खरंच सोपे नाहीये...' सचिनच्या एक्झिटनंतर घरातील सदस्य खूपच भावुक झाले. तन्वी आणि प्राजक्ता खूप रडल्या. आता बिग बॉसचा सातवा आठवडा सुरू झाला आहे.

## टोळी फुटली; रुचिताचा खरा चेहरा रोशनसमोर आला

### रोशनने 'टोळी' सोडल्यामुळे रुचिताला मोठा धक्का



**मुंबई :** 'बिग बॉस मराठी ६' मध्ये आज भाऊच्या धक्क्यावर घरातील एक सदस्य बाहेर जाणार आहे. या आठवड्यात बाहेर जाण्यासाठी ९ सदस्य नॉमिनेट झाले आहेत. यात प्रभू शेळके, प्राजक्ता शुक्रे, दीपाली सय्यद, रुचिता जामदार, राकेश बापट, सचिन कुमावत, अनुश्री माने, रोशन भजनकर आणि सागर कारंडे यांचा समावेश आहे. अशात आता बिग बॉसने नवीन प्रोमो शेअर केला आहे. जो पाहून प्रेक्षकांना खूपच आनंद झाला आहे.

नवीन प्रोमोमध्ये रितेश भाऊ आज भाऊच्या धक्क्यावर घरातील चुगलीचे दार उघडणार आहे. ज्यामुळे घरातील नाती बदलताना दिसणार आहे. घरातील सदस्यांना एक चांगला रिॲलिटी चेक मिळणार आहे. रोशनने 'टोळी' ला रामराम ठोकला आहे. ज्यामुळे रुचिताला मोठा धक्का बसला आहे. नेमकं भाऊच्या धक्क्यावर आज काय घडणार, जाणून घेऊयात. 'टोळी' मध्ये विशाल, रुचिता, अनुश्री आणि रोशन हे सदस्य होते. आता रोशनने टोळी सोडली, अनुश्री विशालच्या विरोधात गेली. ज्यामुळे आता 'टोळी' रुचिता आणि विशाल उरले आहेत. एकंदर टोळी फुटली आहे. व्हिडीओच्या सुरूवातीला पाहू शकता की, अनुश्री तन्वीला बोलते की, 'मला विशालच्या विरोधात जायचे आहे...' हे पाहून विशाल म्हणतो की, 'आपलेच दात आणि आपलेच ओठ...' त्यानंतर रुचिता विशालकडे चुगली करते की, 'रोशन दादाला गेम कळत नाही एवढा...' त्यावर विशाल बोलतो की, 'मला त्याचा भार घेऊन चालायचं नाहीये...' विशाल आणि रुचिताचे बोलणे ऐकून रोशन खूप दुखावतो. तो म्हणतो की, 'कुठेतरी मन दुखलं माझं...मी ही टीम सोडतोय... आजपासून, आतापासून...'

या व्हिडीओवर नेटकरी कमेंट्स करत आहेत. रुचिताचा खरा चेहरा रोशनसमोर आल्यामुळे प्रेक्षक भलतेच खुश आहेत. तसेच चाहते रोशनला पाठिंबा देताना दिसत आहे. आता 'टोळी'तून बाहेर पडल्यावर रोशनचा नवीन प्लान काय असणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. 'बिग बॉस मराठी ६' हा शो रात्री ८ वाजता 'कलर्स मराठी' आणि 'जिओहॉटस्टार'वर पाहायला मिळणार आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नागापूर येथे दिवसाढवळ्या घरफोडी; शेतकरी कुटुंबाचे सव्वा चाळीस हजारांचे दागिने व रोकड लंपास

**जनसंचलन/बुलढाणा**

शेतीकामाला गेलेल्या शेतकऱ्याचे बंद घर फोडून अज्ञात चोरट्यांनी ४४ हजार ८०० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना नागापूर येथे घडली. याप्रकरणी डोणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नागापूर येथील रहिवासी संतोष खनपटे (५०) हे २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास पत्नीसह शेतात कामासाठी गेले



होते. रात्री त्यांचा मुक्काम शेतातच होता. दरम्यान, घराचे कुलूप तुटलेले असल्याचे २३ फेब्रुवारी रोजी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास शेजाऱ्यांच्या लक्षात आले. खनपटे यांनी घरी येऊन पाहिले असता, घरातील कपाट फोडून चोरट्यांनी ८ ग्रॅम सोन्याचे दागिने (किंमत ४०,३०० रुपये) आणि ४,५०० रुपये रोख असा एकूण ४४,८०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला होता. डोणगाव पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. परिसरात वाढत्या घरफोडीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# बुलडाणा अर्बन व ज्ञानगंगा फॉरेस्ट मॅरेथॉनचे आयोजन स्पर्धकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे :-राधेश्याम चांडक




**जनसंचलन/बुलढाणा**

सुलभ पतपुरवठ्याच्या माध्यमातून अर्थ उन्नती साधण्यासाठी हातभार लावणारे व समाजामध्ये विविध उपक्रमांच्या माध्यमातून आनंदाची पेरणी करण्याचं काम राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी यांच्या नेतृत्वात बुलडाणा अर्बन अविरत करत आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून यंदाही बुलडाणा अर्बन व ज्ञानगंगा फॉरेस्ट मॅरेथॉनचे आयोजन बुलढाणा - अजिंठा मार्गावर करण्यात आले आहे. या मॅरेथॉन मध्ये स्पर्धकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले आहे. रन फॉर फॉरेस्ट असे ब्रीद असलेले ही स्पर्धा १ मार्च २०२६ रोजी सकाळी ६ वाजता गजानन महाराज संस्थान अंतर्गत,स्वयंप्रकाश संस्थान, गिरडा ता .जि. बुलडाणा येथुन सुरुवात होणार आहे. यासाठी ऑनलाईन नोंदणी सुरू झाली असून स्पर्धेची सविस्तर माहिती त्यावर देण्यात आलेली आहे. ५ किमी, १० किमी आणि २१ किमी या तीन प्रकारात ही स्पर्धा होईल. या १० आणि २१ किलोमीटर साठी वेळ मर्यादेचे बंधन आहे. या स्पर्धे साठी ऑनलाईन नोंदणी ही २४ फ ेब्रुवारी २०२६ रात्री १२ वाजेपर्यंत पर्यंत करता येणार आहे. त्यानंतर सदर रजिस्ट्रेशन ऑफलाईन साठी श्री रविंद्र पाटील- ९८३४३६६७१५ सचिन गाढवे - ९९७०६२६०४१ यांच्याकडे स्विकारले जाणार आहे.

दरवर्षी या स्पर्धेला महाराष्ट्रातून खूप मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळतो. याही वर्षी असाच प्रतिसाद मिळेल असा विश्वास बुलडाणा अर्बनचे सर्वेसर्वा राधेशाम चांडक यांनी व्यक्त केला आहे.

सदर स्पर्धेसाठी सहकार विद्या मंदिर, सांस्कृतिक सभागृह, चिखली रोड, बुलडाणा येथे दि २८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत सर्व सहभागी स्पर्धकांना या स्पर्धेसाठी अधिकृत टी-शर्ट, गुडी बॅग टी-शर्ट ,बीब नंबर मिळणार आहे, तर स्पर्धेसाठी फिनिशर साठी फिनिशर मेडल, ब्रेकफास्ट आणि सोबतच या मार्गावर वैद्यकीय मदत आणि अन्य आवश्यक सुविधा पुरविण्यात येणार आहेत. निसर्गाशी पुन्हा एकदा कनेक्ट होण्यासाठी ही स्पर्धा महत्त्वाची आहे.

# समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त दीपक मांटे यांचा अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने सत्कार।

**जनसंचलन/बुलढाणा**

कठीण परिस्थितीतून यश मिळवत यशाला गवसणी घालून महाराष्ट्र लोकसेवा आयोग आयोगाच्या मार्फत ४ थ्या क्रमांकाने तब्बल दोन वेळा वर्ग १ पदी निवड झाली त्यामध्ये समाज कल्याण विभागामध्ये सहाय्यक आयुक्त तसेच इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभागामध्ये सहाय्यक संचालक या पदांवर निवड झालेल्या मातृतीर्थ सिंदखेडराजा तालुक्यातील देरेगावचे सुपुत्र दिपक सु.मांटे यांचा दिनांक २३ फेब्रुवारी रोजी लोकसेवा नशामुक्ती व्यसन केंद्रामध्ये अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला गावच्या सर्वांगीण विकासासाठी समाज कल्याण विभागामध्ये विविध प्रकारच्या योजनांची चर्चा केली. तसेच एक आदर्श गाव बनवण्यासाठी त्यांनी स्वतःच्या गावामध्ये लोकसहभागातून तसेच शासनाच्या विविध उपक्रमाच्या माध्यमातून देरेगाव या गावांमध्ये विविध उपक्रम त्यांनी राबवले. आज रोजी तालुक्यामध्ये एक आदर्श गाव म्हणून देरेगावचा नावलौकिक झालेला आहे. गावातील लोक जातीपातीचे राजकारण सोडून जेव्हा विकासासाठी एकत्र येते तेव्हा काय होऊ शकतं याचं देरेगाव येथील नागरिकांनी एक उदाहरण दिलेला आहे. यावेळी त्यांनी लोकसेवा व्यसनमुक्ती केंद्र तर्फे राबवण्यात आलेल्या विविध उपक्रमाची माहिती घेतली आतापर्यंत लोकसेवा व्यसनमुक्ती केंद्र मधून १००० पेक्षा जास्त तरुणांनी दारूचे व्यसन सोडले आहे त्यामुळे राधेश्याम बंगाळे पाटील त्यांचेही त्यांनी कौतुक केले यावेळी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे विदर्भ उपाध्यक्ष प्रताप दादा मोरे यांच्या हस्ते समाज कल्याण सहाय्यक आयुक्त नागपूर दीपक मांटे यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला . यावेळी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन खंडारे , जिल्हा प्रसिद्धी प्रमुख समाधान सरकटे तालुका अध्यक्ष गणेश पंजरकर पत्रकार अहमद कुरेशी जुबेर शहा गणेश काळे पिंपळगावचे माजी उपसरपंच बंडू ठाकुर. नशामुक्ती व्यसन केंद्राचे संचालक राधेश्याम बंगाळे यावेळी उपस्थित होते.

# सवना येथे महाबीजच्या पिक प्रात्यक्षिक कार्यक्रमास शेतकऱ्यांचा उत्तम प्रतिसाद




**जनसंचलन/बुलढाणा**

सवना ता. चिखली जि. बुलढाणा येथे श्री समाधान पवार यांच्या शेतात महाबीज हरभरा फुले विश्वराज या वाणाचा पीक प्रात्यक्षिक कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. सदरील कार्यक्रमास श्री. गजाजन देशमुख विभागीय व्यवस्थापक महाबीज अकोला व श्री. अशोक ठाकरे, जिल्हा व्यवस्थापक महाबीज, बुलढाणा तसेच महाबीज अधिकारी कर्मचारी आणि परिसरातील शेतकरी बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते. मा. विभागीय व्यवस्थापक अकोला यांनी उपस्थित शेतकऱ्यांना हरभरा फुले विश्वराज वाणाबद्दल सविस्तर माहिती दिली तसेच उन्हाळी मूग, महाबीज ट्रायकोडर्मा, जैविक खते, -९ केळी, पपई, ढेंचा तसेच येणाऱ्या खरीप हंगामातील महाबीजकडे उपलब्ध सोयाबीन वाणांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. जिल्हा व्यवस्थापक अशोक ठाकरे उपस्थित शेतकऱ्यांना महाबीज च्या सर्व ध्येय धोरणा बाबत माहिती दिली. या वाणाबद्दल अतिशय समाधानकारक प्रतिक्रिया दिली .तसेच येणाऱ्या खरीप हंगामात महाबीज द्वारा उत्पादित डबल लेबल चे प्रमाणित बियाण्याचेच वापर करू असे आश्वासन दिले. शेतकऱ्यांना महाबीज उत्पादित सर्व प्रोडक्ट बद्दल मार्गदर्शन केले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सातपुड्यातील पत्रकारितेचा गौरव आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्काराने संग्रामपूरचा मान उंचावला



**पुरस्कार म्हणजे जबाबदारी**

**पुरस्कार हा केवळ सन्मान नसून जबाबदारी आहे. संग्रामपूर तालुका पत्रकार संघाने ही जबाबदारी जपत समाजाभिमुख पत्रकारिता अधिक बळकट करावी, अशी अपेक्षा जिल्हाध्यक्ष रणजीत राजपूत यांनी व्यक्त केली. विजेत्या संघानेही ही अपेक्षा पूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त केला.**

जनसंचलन/बुलढाणा

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचा प्रतिष्ठेचा आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार संग्रामपूर तालुका पत्रकार संघाला २२फेब्रुवारी रोजी कर्जत (जि. रायगड) येथे आयोजित भव्य सोहळ्यात हा प्रदान करण्यात आला. राज्यभरातील ३५५ तालुक्यांमधून निवड होत पहिल्या पाचमध्ये स्थान मिळवत संग्रामपूरने हा मान पटकावला. या यशामुळे संग्रामपूर तालुक्यासह बुलढाणा जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. समाजाभिमुख व विकासाभिमुख पत्रकारितेमुळे संग्रामपूर तालुक्याचा विशेष उल्लेख केला जातो. राजकारणाला केवळ टीकेपुरते न ठेवता विकासासाठी प्रेरक लिखाण करणारी पत्रकारिता हे येथील वैशिष्ट्य असल्याची दखल या पुरस्कारातून घेण्यात आली. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद ही १९३९ पासून पत्रकारांच्या हितासाठी कार्यरत असलेली मातृसंस्था आहे. परिषदेच्या वतीने दरवर्षी उल्लेखनीय कार्यासाठी विविध आदर्श पुरस्कार दिले जातात. यंदाचा वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार संग्रामपूरला मिळाल्याने अमरावती महसूल विभागातून एकमेव बुलढाणा जिल्ह्याचा गौरव झाला. कर्जत येथील सोहळ्यात मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, मावळचे खासदार शिरंग बारणे, माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार महेंद्र थोरवे, वृत्तवाहिनी प्रतिनिधी मंदार फणसे, राजकीय विश्लेषक हेमंत देसाई, प्रदेश प्रतिनिधी चंद्रकांत बर्दे , बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीत राजपूत, डिजिटल मीडिया परिषदेचे विभागीय सचिव जितेंद्र कायस्थ, पत्रकार हल्ला विरोधी समितीचे प्रमुख राजेश डीडोळकर, डिजिटल परिषदेचे सचिव दीपक मोरे बुलढाणा शहर पत्रकार संघाचे उपाध्यक्ष सुनील मोरे, कोषाध्यक्ष अजय राजगुरे तसेच रायगड प्रेस क्लब अध्यक्ष अभय आपटे, राहुल देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. राज्य पातळीवरील हा पुरस्कार सन्मानपत्र, मानचिन्ह, शाल व श्रीफळ अशा स्वरूपात प्रदान करण्यात आला. संघाची एकजूट ठरली यशाची गुरुकिल्ली पुरस्कार स्वीकारण्यासाठी संग्रामपूर तालुका पत्रकार संघाची संपूर्ण टीम उपस्थित होती. अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील दादळे, जिल्हा समन्वयक पंजाबराव ठाकरे, जिल्हा कार्याध्यक्ष अझहर अली, ज्येष्ठ मार्गदर्शक रामेश्वर गायकी, केंद्रीय जिल्हा कार्यकारी सदस्य श्याम देशमुख, तालुका कार्याध्यक्ष राजेंद्र धर्माधिकारी, सचिव विवेक राऊत, उपाध्यक्ष शेख अब्दुल, उपाध्यक्ष कासम सुरत्ने, कोषाध्यक्ष वासुदेव दामोधर, तालुका संघटक श्याम इंगळे, मोहन सोनोने, विभागीय संघटक डॉ. संतोष लांडे,सागर कापसे जिल्हा समिती सदस्य आकाश पालीवाल, हल्लाकृती समिती सदस्य स्वप्निल देशमुख, डिजिटल मीडिया तालुका अध्यक्ष गोपाल धर्मळ, उपाध्यक्ष भगवान पाखरे, ज्ञानेश्वर आतकरे, विठ्ठल निंबोळकार, नंदू पाटील खानझोड आदी पदाधिकारी उपस्थित होते. संग्रामपूर हा आदिवासी बहुल व मागास तालुका म्हणून ओळखला जात असला, तरी येथील पत्रकारितेने शहरी तालुक्यांनाही मागे टाकत वेगळेपण सिद्ध केले आहे. सामाजिक प्रश्न, जनहिताचे मुद्दे आणि ग्रामीण भागातील समस्यांना सातत्याने वाचा फोडत केलेल्या कार्याची ही राज्यस्तरीय पावती मानली जात आहे. डिजिटल युगात स्पर्धा वाढली असली तरी ग्राउंड रिपोर्टिंग व स्थानिक प्रश्नांवरील भक्कम मांडणीमुळे ग्रामीण पत्रकारिता आजही प्रभावी ठरत असल्याचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी सांगितले. परिषदेच्या अकरा अध्यक्षांच्या भाषणांचा संग्रह प्रकाशित करण्याचेही त्यांनी यावेळी जाहीर केले.

# सुप्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. रवी शिंदे यांना लोकमत जिल्हा गौरव पुरस्कार प्रदान...

## हजारो दृष्टीहीनांच्या आयुष्यात प्रकाश पेरणाऱ्या सेवाव्रतीचा सन्मान; सलग दोन वर्षे राज्य शासनाचाही गौरव




जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा वैद्यकीय सेवा हा केवळ व्यवसाय नसून तो एक धर्म आहे, हे आपल्या कार्यातून सिद्ध करणारे बुलढाण्यातील शिंदे नेत्रालयाचे संचालक व ख्यातनाम नेत्रतज्ज्ञ डॉ. रवी दौलत शिंदे यांना मानाच्या लोकमत जिल्हा गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या अतुलनीय वैद्यकीय सेवा आणि सामाजिक बांधिलकीची दखल घेत हा गौरव करण्यात आला. डॉ. रवी शिंदे यांनी २०१७ पासून आजपर्यंत हजारो यशस्वी नेत्रशस्त्रक्रिया करून एक उल्लेखनीय विक्रम प्रस्थापित केला आहे. त्यांच्या शस्त्रक्रियांची अचूकता, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि रुग्णांशी असलेला जिव्हाळ्याचा संवाद यामुळे शिंदे नेत्रालय हे नाव जिल्हाभरात विश्वासाचे प्रतीक बनले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाने देखील सन २०२१-२२ आणि २०२२-२३ या सलग दोन वर्षात राज्यातील सर्वाधिक यशस्वी नेत्रशस्त्रक्रिया केल्याबद्दल त्यांचा गौरव केला आहे. डॉ. शिंदे यांचे कार्य केवळ रुग्णालयापुरते मर्यादित न राहता ते समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले आहे. विशेषतः दुर्गम आणि आदिवासी भागातील रुग्णांसाठी त्यांनी राबवलेले उपक्रम कौतुकास्पद आहेत. मोफत उपचार: मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरांच्या माध्यमातून शेकडो गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना त्यांनी मोफत दृष्टी दिली आहे. दुर्गम भागात सेवा: आरोग्य सेवा पोहोचण्यास कठीण असलेल्या भागात स्वतः जाऊन सेवा देण्याची त्यांची जिद्द ही नव्या पिढीतील डॉक्टरांसाठी प्रेरणादायी आहे. दोन वर्षांचा राज्य पुरस्कार आणि आता जिल्हा गौरव व्यावसायिक उत्कृष्टता आणि मानवी संवेदनशीलता यांचा सुंदर संगम डॉ. शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो. त्यांनी केवळ डोळ्यांवर उपचार केले नाहीत, तर अंधकारमय झालेल्या हजारो आयुष्यात आशेचा किरण निर्माण केला आहे. त्यांच्या या निरंतर सेवायज्ञाचा गौरव म्हणून त्यांना लोकमत जिल्हा गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, ज्यामुळे जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. या सन्मानाबद्दल जिल्ह्यातील वैद्यकीय क्षेत्र, सामाजिक संस्था आणि रुग्णांकडून डॉ. रवी शिंदे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८